राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजुरी बाबत सन २०१९-२०.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : नाक्षेवि -२०१९/प्र.क्र.९५/का.९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ०९ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८ जून, २०१५.
२) शासन पूरकपत्र, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.५/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, नाक्षेवि -२०१९/प्र.क्र.२२/का.९, दि. २९ जून, २०१९.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं - २०१९/ प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

अल्पसंख्याक विकास विभागाने सन २००८-०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित केला असून उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ही योजना सन २०१५-१६ या वर्षात राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये, दि.१८जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (ब) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार व आमदार यांच्या प्रस्तावांना महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत हद्दीमध्ये कामाच्या संख्येची मर्यादा एकापेक्षा जास्त परंतू प्रति काम प्रति वर्षी महानगरपालिकेस कमाल रु.४० लक्ष, "अ" वर्ग नगरपालिकेस कमाल रु.३०लक्ष, “ब" व रु.२०लक्ष "क" वर्ग नगर पंचायतींना असू शकेल, अशी तरतूद आहे. मा.खासदार व आमदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांचे प्राप्त प्रस्तावांना मंजूरी देऊन सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीपैकी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील बहुल अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास योजनेकरिता सन२०१९-२०या आर्थिक वर्षात रु.४१,८९,००,०००/-(अक्षरी रूपये एक्केचाळीस कोटी एकोणनव्वद लक्ष फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पिय करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ४ च्या शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.०८ जुलै,२०१९ च्या मार्गदर्शक सूचनानुसार अर्थसंकल्पीत निधीपैकी माहे एप्रिल,२०१९ ते डिसेबर ,२०१९ पर्यंत नऊ महिन्या करीता अर्थसल्कपित निधीच्या ६० टक्के च्या प्रमाणात निधी वितरीत करण्यास मान्यता करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर योजनेअंतर्गत एकूण अर्थसल्कपित निधीच्या ६० टक्के म्हणजेच रु. २५.१३४ कोटी निधी वितरनास उपलब्ध आहे त्यापैकी संदर्भ क्र.३ च्या दि. २९ जुन, २०१९ च्या शासन निर्णयान्वये रु.२.५४ लक्ष ऐवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. सबब उर्वरीत २२.५९४ कोटी रुपये वितरणास उपलब्ध आहेत. मा.मंत्री/ राज्यमंत्री/ खासदार/ आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत हद्दीमध्ये विकास कामांच्या प्रस्तावांना सन २०१९-२०च्या अर्थसंकल्पीत उपलब्ध तरतूदीपैकी अनुदान वितरीत करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे **एकूण रु.१२,६३,२९,२००/- (एकूण अक्षरी रुपये बारा कोटी त्रेसष्ठ लक्ष एकोनतिस हजार दोनशे फक्त)** एवढा निधी मंजूर करण्यात येत आहे. सदर निधी संबधित महानगरपालिका/म्हाडा/नगरपालिका/नगर पंचायत ज्या जिल्हयांमध्ये स्थित आहेत, त्या जिल्हयांचे जिल्हाधिकारी यांना स्वाधीन करण्यात येत आहे.

२. संबंधित महानगरपालिका /म्हाडा/नगरपालिका/नगरपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास, त्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासनाच्या कोषागारात तात्काळ जमा करण्यात यावा. तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही संबधित जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित महानगरपालिका/म्हाडा/ नगरपालिका/ नगरपंचायत यांना सुपूर्द करण्यात यावा. तसेच सदर कामे महानगरपालिका/ म्हाडा/नगरपालिका/नगरपंचायतीच्यां बांधकाम विभागामार्फत रितसर करुन घेण्यात यावीत.

३. राज्यातील महानगरपालिका/म्हाडा/नगरपालिका/नगरपंचायतींनी मागणी केल्यानुसार ज्या विवक्षित प्रयोजनासाठी निधि मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित महानगरपालिका/म्हाडा/ नगरपालिका/ नगरपंचायतींना निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित महानगरपालिका/ म्हाडा/नगरपालिका/नगरपंचायतींना सहा महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट "ब"** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. अल्पसंख्याक नागरी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील महानगरपालिका/म्हाडा/ नगरपालिका/ नगरपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च " मागणी क्र. झेडई-१, मुख्यलेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास योजनेकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२३५-ए-१३१) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वर्षाकरिता मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. “सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका -१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ४ येथील वित्त विभागाच्या दि.०८जुलै,२०१९रोजीच्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.”

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८०९१७५८२१८६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.08.09 18:04:59 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित विभागीय आयुक्त,
१०.आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
११.संबंधित जिल्हाधिकारी,
१२.आयुक्त, संबंधित महानगरपालिका,
१३.मुख्याधिकारी, संबंधित नगरपालिका,
१४.मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१५.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१७.निवडनस्ती (का-९)

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. नाक्षेवि-२०१९ /प्र.क्र. ९५ /का.९, दि. ०९ ऑगस्ट, २०१९.

परिशिष्ट - "अ"

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक बहुलनागरी क्षेत्रांकरिता क्षेत्र विकास कार्यक्रम महानगरपालिका म्हाडा/ नगरपालिका /नगरपंचायतींचे जिल्हानिहाय निधी वितरणाचे विवरणपत्र.

अ.क्र.	जिल्हा	म.न.पा./न.पा./ न.प.	कामाचे नांव	मंजूर निधी (लाखात)
१	मुंबई (उपनगर)	गोरेगाव	मोकल गल्ली, भगतसिंगनबर नं. १, गोरेगाव पश्चिम येथे गटारे व लादीकरण करणे	१५
			चक्की गल्ली, भगतसिंग नगर नं. १, गोरेगाव पश्चिम येथे गटारे व लादीकरण करणे	१५
			मिनाताई वेलफेअर सोसायटी जवळ, हनुमान नगर, गोरेगाव पश्चिम येथे शौचालय बांधणे	२०
		बोरीवली	सत्या नगर, सत्य साई कृपा बिल्डींग जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम	२५
			साईबाबा नगर, बाजु सोसायटी जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम	२५
			साईबाबा नगर, एमबीजू सोसायटी जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम	२५
			साईबाबा नगर वोरली बिल्डींग जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम	२५
			साईबाबा नगर, मेघना अपार्टमेंट जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम	२५
			कामधेनू बिल्डींगजवळील रस्त्याचे बांधकाम	१५
			साईबाबा नगर, देसाई आणि शेठ नगर बाहुबली टॉवर जवळ रस्त्याचे बांधकाम	२५
			साईबाबा नगर, देसाई आणि शेठ नगर अरिहंत बिल्डींग जवळ रस्त्याचे बांधकाम	२०
			श्रॉप टॉवर जवळ पायवाट आणि गटाराचे बांधकाम करणे	१५
		वांद्रे	चाळ नं. १, २, ३ जवळ, स्लॉटर हाऊस, वांद्रे (प) येथे शौचालय बांधणे	२०
			कामेश्वरी मैदान जवळ, वांद्रे (प) येथे कॉंक्रेटीकरण करणे	२५

			शास्त्री नगर, गल्ली क्र. १ जवळ, वांद्रे (प) येथे ड्रेनेज व पॅसेजचे काम करणे	१२
			मौलाना बाबा चाळ जवळ, वांद्रे (प) येथे ड्रेनेज व पॅसेज चे काम करणे	१०
			दर्गा गल्ली जवळ, वांद्रे (प) येथे शौचालय व ड्रेनेजचे काम करणे	१४
			कुरेशी नगर जवळ, वांद्रे (प) येथे शौचालय बांधणे	१४
			चाळ क्र. २ जवळ, कुरेशी नगर, वांद्रे (प) येथे शौचालय व ड्रेनेजचे काम करणे	१२
		कांदिवली	इस्लाम कंपाऊंड, कांदिवली (प) येथे मलनिस:रन वाहिणी व गटारे बांधणे	५
			भारत नगर, गांधी नगर, कांदिवली (प) येथे गटारे बांधणे व पायवाटा बनविणे	५
			साबरीया मस्जिदजवळ, गांधीनगर कांदिवली (प) येथे गटारे व पायवाटा बनविणे	५
			जमजम गल्ली, कांदिवली (प) येथे गटारे व पायवाटा बनविणे	५
			खान गल्ली, गरूडा पेट्रोल पंप समोर मलनिस:रण वाहिणी टाकणे	५
			यशोधरा चाळ कमिटी, गावदेवी रोड,पोयसर, कांदिवली पूर्व येथे बुध्दविहार बांधणे	२५
		बोरीवली	एक्सर नायतोडी, बोरीवली (प) येथे दफनभूमी ला संरक्षक भिंत व बसण्याकरीता व्यवस्था करणे	१०
		मुंबई उपनगर	चकाला गावठाण व परिसर हयात नगर, फिश मार्केट जवळ, अंधेरी पूर्व येथे ड्रेनेज लाईन व पायवाटा / गटार बांधणे	५
			जाकु क्लब मस्जिदच्या समोर सांताक्रुझ पूर्व येथे कंपाऊंड वॉल बाधणे	५
			डोनाल्ड आऊस व परिसर जे. बी. नगर, अंधेरी पूर्व येथे ड्रेनेज लाईन व पायवाटा / गटार बांधणे	५
			इंदिरा नगर व परिसर मस्जिद जवळ, मरोळ पाईप लाईन अंधेरी पूर्व येथे पायवाटा व गटार बांधणे	५

			न्यु बामणवाडा हिल, सिगरेट फॅक्टरी समोर, शितल अपार्टमेंट जवळ विलेपार्ले पूर्व येथे पायवाटा -गटार बांधणे	५
		मालाड	चाळ नं. ९९ ते १०४, गायकवाड नगर, भारतमाता शाळेजवळ लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. ०६, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १३, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १४, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १५, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १६, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १७, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण व गटार बांधणे	१०
			प्लॉट नं. १९, कलेक्टर ओल्ड कंपाऊंड लादीकरण	१०
			प्लॉट नं. २१४, कसाईवाडा, एनसीसी लादीकरण व गटार	१०
			कॉटर्स कॉलनी, दिव्या हॉटेल समोर लादीकरण व गटार	१०
		मिरारोड, नयानगर	प्रभाग क्र. ९ मध्ये रस्ते व गटार बांधणे	२५
			प्रभाग क्र. १९ मध्ये रस्ते व गटार बांधणे	२५
			मुंबई उपनगर एकूण	**५९२.००**
२	मुंबई शहर	मुंबई शहर	श्री.राज राजेंद्र सुरीश्वरजी जैन मंदीर येथे ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५
			विमलानाथ जैन देरासर, डॉ. बी. आय. रोड ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५

			गुरू मंदिर, श्याम निवास, भुलाभाई देसाई रोड, ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५
			सुन्नी नगिना मस्जिद, एमडीएम न्यु अप्रोच रोड ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५
			तयबा मस्जिद, डीएमजी रोड, तुलसीवाडी, ताडदेव ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५
			अंजुमन तालीया व बअलीया ट्रस्ट मस्जिद, डीएक्स/६, सिमला नगर ड्रेनेज लाईन टाकणे व लादीकरण करणे	५
	मुंबई	मुंबई शहर	सय्यद अली मीरा दातार दर्गाह अॅन्टॉप हिल, वडाळा जवळ पेव्हर ब्लॉक बसविणे व सौदर्यीकरण	२.९५
			भारतीय कमला नगर, अहलेक हदीस मस्जिद जवळ अॅन्टॉप हिल, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.८
			आझाद मोहल्ला, शांती नगर, सॉल्ट पॅन रोड, अॅन्टॉप हिल, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.७
			करबला मस्जिद जवळ, भारती कमला नगर, अॅन्टॉप हिल, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.७५
			बरकत अली नगर, अॅन्टॉप हिल, वडाळा, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.७
			गरीब नवाज नगर, कोकरी आगार अॅन्टॉप हिल, वडाळा, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.८
			दीनबंधू नगर, सॉल्ट पॅन रोड अॅन्टॉप हिल, वडाळा, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.७५
			गोरखपूर चाळ संगम नगर, सॉल्ट पॅन रोड अॅन्टॉप हिल, वडाळा, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.७५

			गुलशन ए बगदाद मदरसा शेजारी विजय नगर सॉल्ट पॅन रोड ॲन्टॉप हिल, वडाळा, सायन कोळीवाडा गटारे पायवाटा बनविणे व नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन टाकणे	२.८
			मुंबई शहर एकूण	**५५.००**
३	ठाणे	कल्याण-डोंबिवली	प्रभाग क्र. ३५ रोहिदास वाडा येथे भवानी निवास ते बागवान कॉलनी परिसरात गटार व पायवाट बनविणे	१०
			प्रभाग क्र. ३२ जामा मस्जिद ते तान्की हाऊस व परिसरात छोटे रस्ते व गटार तयार करणे	१५
			ठाणे एकूण	**२५.००**
४	पुणे	बारामती	खंडोबा नगर येथील इदगाह मैदानावर पेव्हर ब्लॉक किंवा कॉंक्रीटीकरण करणे	१६
			पुणे एकूण	**१६.००**
५	औरंगाबाद	औरंगाबाद	वॉर्ड क्र. ३६, नारेगाव ब्रिजवाडी येथील पावरलूम अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे	१०
			वॉर्ड क्र. ३६, नारेगाव ब्रिजवाडी सोयनालनगर पाणीपुरवठयासाठी पाईपलाईन टाकणे	१०
			वॉर्ड क्र. ३६, नारेगाव ब्रिजवाडी येथील ताहेरभाई यांचे घर ते पापुडवाला यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे	१०
			वॉर्ड क्र. ६५ सुराणानगर येथील बसैये नगर अहिंसानगर येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता	२०
			वॉर्ड क्र. ५५ भवानी नगर येथील हरी मस्जिद ते श्री. जैस्वाल यांचे घर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता	१०
			वॉर्ड क्र. ६० उत्तर बायजीपूरा अंतर्गत रस्त्याची कामे करणे	१०
			वॉर्ड क्र. ५५ भवानी नगर दत्तनगर दादा कॉलनी येथील अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता	१०
			वॉर्ड क्र. ५६ सी ९ अंतर्गत रस्ता करणे तसेच संजय नगर अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे	१०
			वॉर्ड क्र. ६२ एन-६ विश्तिया कॉलनी येथील ई सेक्टर मधील मस्जिदीच्या बाजूला सामाजिक सभागृह बांधकाम करणे	१०

			वॉर्ड क्र. ५६ संजयनगर येथील गल्ली नं. सी-९ अंतर्गत रस्ता तयार करणे	८
			वॉर्ड क्र. ५९ दक्षिण बायजीपूरा अंतर्गत रस्त्याचे काम करणे	१०
			वॉर्ड क्र. ४५ कैसर कॉलनी अंतर्गत जिन्सी खासगेट येथील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे	७
			वॉर्ड क्र. ३६ नारेगाव कैसर पार्क ते कौसर मस्जिद पर्यंत सिमेंट कॉक्रीटीकरण करणे	१५
			वॉर्ड क्र. ४६ नवाबपूरा येथील म्हशीच्या गोठयाजवळील अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण व ड्रेनेज लाईन टाकणे	२०
			वॉर्ड क्र. ४५ कैसर कॉलनी गल्ली ३ मिनार मस्जिद भुसरा हॉटेल गल्ली नं. ४ सलेम पटेल यांच्या घरासमोर कॉंक्रीटीकरण करणे	१०
			वॉर्ड क्र. ५९ गंजेशहीदा कब्रस्तानच्या संरक्षण भिंतीचे व तार कंपाउंड रंगरंगोटी करणे व बांधकाम करणे	१०
		नारायणपूर	इदगाह बांधकाम करणे तसेच कब्रस्तान कंपाऊंड करणे	२५
			औरंगाबाद एकूण	**२०५.००**
६	जळगाव	जामनेर	मौजे लोंद्री, ता. जामनेर येथे शादीखाना सभागृह बांधकाम	२५
			मौजे देऊळगाव, ता. जामनेर येथे शादीखाना सभागृह बांधकाम	२५
			जळगाव एकूण	**५०.००**
७	धुळे	दोंडाईचा	गौसीया नगर येथे सभा मंडप (शादी खाना) व त्या अनुषंगीक विकास काम करणे	४०
		शिंदखेडा	नदीपार कब्रस्तानसाठी संरक्षण भिंत बांधकाम	१०
			धुळे एकूण	**५०.००**
८	अहमदनगर	नेवासा	प्रभाग क्र. ९ मध्ये अमोलिक चर्च येथे संरक्षक भिंत बांधणे	१०
			प्रभाग क्र. ९ मध्ये सेव्हनडे चर्च समोर पेव्हर ब्लॉक बसविणे	१०
			प्रभाग क्र. ८ मध्ये मातंग समाज स्मशानभूमी संरक्षण भिंत बांधणे	५
			अहमदनगर एकूण	**२५.००**
९	रायगड	मुरुड-जंजिरा	सिध्दीनगर येथील रस्ता कॉंक्रीटकरण	५०
			रायगड एकूण	**५०.००**

१०	रत्नागिरी	गुहागर	पांगरे तर्फे हवेली जेटी ते कबुला हुसैन दर्गा रस्ता खडीकरण व डांबरीकरण	५
			पांगरी तर्फे हवेली भुरकुंडा मोहल्ला ते सडेवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण	५
			पेवे गुरवकोंड ते मुस्लीम मोहल्ला रस्ता खडीकरण व डांबरीकरण	५
			रुकदीन घर ते सुरेश तेरेकर विसापूर तिसरीवाडी रस्ता डांबरीकरण करणे	५
			रत्नागिरी एकूण	**२०.००**
	सांगली		सांगली मार्केट यार्ड येथील मुस्लीम कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधणे	५
			सांगली एकूण	**५.००**
१२	यवतमाळ	बाभूळगाव	वॉर्ड क्र. ५ मधील मुस्लीम कब्रस्तान येथे काँक्रीट रस्ता बांधकाम	१०.२९२००
		ईसापूर	रेस्ट हाऊस जवळ शादीखाना बांधकाम करणे	२५.००
			यवतमाळ एकूण	**३५.२९२००**
१३	वर्धा	सेलू	वार्ड क्र. ८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये चांद सावली दर्गाजवळील परिसराचे सौंदर्यीकरण व हायमास्ट लाईट लावणे	१५
			वार्ड क्र. ८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये समिर शेख (केबलवाले) ते अनिल चौधरी यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता	३
			वार्ड क्र. ८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये मुर्तूजा मंसूरी ते मालेराम नरेडी यांचे घरापर्यंत सिंमेंट रस्ता	४
			वार्ड क्र. ८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये आठवडी बाजार परिसरात विद्युत रोषणाई करणे	३
			वर्धा एकूण	**२५.००**
१४	बीड	अंबाजोगाई	पेन्शनपुरा येथे हायमास्ट लॅम्प बसविणे	२
			सदर बाजार येथे एलईडी लॅम्प बसविणे	२
			सदर बाजार येथे हायमास्ट लॅम्प बसविणे	२
			सदर बाजार येथे हायमास्ट लॅम्प बसविणे	२
			फातेमा नगर येथे हायमास्ट लॅम्प बसविणे	२
			किरमाणी दर्गा अंबाजोगाई येथे संरक्षण भिंत बांधणे	१०

			मौलाली दर्गा अंबाजोगाई येथे संरक्षण भिंत बांधणे	५
			बीड एकूण	**२५.००**
१५	गोंदिया	देवरी	जन्नतखाना (शादी खाना)	२०
		आमगाव	जन्नतखाना (शादी खाना)	५
			गोंदिया एकूण	**२५.००**
१६	गडचिरोली	कोरची	अल्पसंख्याक वसाहतीमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते व नाली बांधकाम करणे	१०
		आरमोरी	कब्रस्तानला पेव्हींग ब्लॉक रस्ता बांधकाम करणे	१०
		आरमोरी	मौजा आरमोरी येथे अल्पसंख्याक वसाहतीमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते व नाली बांधकाम करणे	५
			गडचिरोली एकूण	**२५.००**
१७	नागपूर	पुर्व नागपूर	जैन मंदीर परिसर सिमेंट / डांबरीकरण रस्ता	२५
			नागपूर एकूण	**२५.००**
१८	नांदेड	कुंडलवाडी	इदगा मैदान व कब्रस्तान करीता आर.सी.सी. रस्ता, संरक्षण भिंत, वाटा, पाणी व विद्युत व्यवस्था करणे	१०
			नांदेड एकूण	**१०.००**
			एकूण (अक्षरी रु.बारा कोटी त्रेसष्ठ लक्ष एकोनतिस हजार दोनशे मात्र)	**१२,६३,२९,२००**

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.08.09 18:05:49 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. नाक्षेवि -२०१९ /प्र.क्र. ९५ /का.९, दि. ०९ ऑगस्ट, २०१९.

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांसाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, **क्र. नाक्षेवि -२०१९ /प्र.क्र.९५ /का.९, दि. ०९ ऑगस्ट,२०१९** अन्वये वितरित केलेला रु. /- (अक्षरी रु.) एवढा निधि पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष / अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधि मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज /अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांची स्वाक्षरी	संबंधित महानगरपालिका / नगरपालिका ज्या जिल्हयात स्थित आहेत त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****